श्री. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचलित

# श्रीमती मीनलबेन महेता कॉलेज, पाचगणी

## ता. महाबळेश्वर, जि. सातारा

आणि

# मराठी समाजशास्त्र परिषद

## यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

## मराठी समाजशास्त्र परिषदेचे ३४ वे राष्ट्रीय अधिवेशन

## दि. १७ व १८ फेब्रुवारी २०२५



# लिंगभाव, शिक्षण आणि विकास

श्रीमती मीनलबेन महेता कॉलेज, पाचगणी, ता. महाबळेश्वर, जि. सातारा आणि मराठी समाजशास्त्र परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने **दि. १७ व १८ फेब्रुवारी २०२५** रोजी **मराठी समाजशास्त्र परिषदेचे ३४ वे राष्ट्रीय अधिवेशन** आयोजित करण्यात आले आहे. आपणास विनंती आहे की, हे आमंत्रण आपल्या महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, संशोधक विद्यार्थी आणि संयोजक अभ्यासकांच्या निदर्शनास आणून द्यावे. तसेच या अधिवेशनासाठी आपणाकडून उदंड प्रतिसाद मिळेल अशी अशा आहे. मराठी समाजशास्त्र परिषदेच्या अधिवेशनाचा मुख्य विषय **'लिंगभाव, शिक्षण आणि विकास'** हा आहे.

## मराठी समाजशास्त्र परिषदेचे ३४वे अधिवेशनासाठी उपविषय

**'लिंगभाव, शिक्षण आणि विकास'** या मुख्य विषयाच्या अनुषंगाने व संशोधन समितीनुसार संशोधक व प्राध्यापकांनी खालील उपविषयावर आपले शोध निबंध पाठवावेत. संशोधन समिती व त्यांचे उपविषय:

### संशोधन समिती ०१ : महाराष्ट्र सातत्य आणि परिवर्तन

**समन्वयक - डॉ. सुधीर येवले**, ईमेल - msprc001@gmail.com, मो. नं. ९६८९०६६८४६

**शोधनिबंध उपविषय :** महाराष्ट्रातील पंचायत राज, लोकशाही विकेंद्रीकरण, महिला आरक्षण धोरण आणि महिला सबलीकरण, महाराष्ट्रातील स्थलांतरित महिला व मुलींचे विविध प्रश्न, महाराष्ट्राचे महिला विकास विषयक धोरण, महाराष्ट्राचे शैक्षणिक धोरण - लिंगभाव, शिक्षण आणि विकास, महिला सबलीकरणाच्या महाराष्ट्रातील विविध विकास योजना आणि त्यांचे मूल्यमापन, मुलींची शिक्षण व विविध विकास योजना, महाराष्ट्रातील मुलींचे शिक्षणातील गळतीचे प्रमाण, महाराष्ट्रातील प्रादेशिक अनुशेष / असमतोल आणि असमतोल विकासाची कारणे परिणाम आणि उपाय, महाराष्ट्रातील समूह अस्मिता आणि बदलते संदर्भ, सहकार आणि परिवर्तन, शासकीय योजनाची महाराष्ट्राच्या सामाजिक परिवर्तनातील भूमिका, विविध अशासकीय सामाजिक संस्थांचे (सेवाभावी संस्थांचे) महाराष्ट्राच्या विकासातील आणि परिवर्तनातील योगदान, महाराष्ट्रातील विविध लोककला, संत परंपरा, सामाजिक चळवळी आणि महाराष्ट्राची लिंगभाव समानतेच्या दिशेने सामाजिक जडणघडण

### संशोधन समिती ०२ : जागतिकीकरण आणि विकास

**समन्वयक - डॉ. अनिल जायभाये**, ईमेल - msprc002@gmail.com, मो. नं. ८०१०७८५९८९

**शोधनिबंध उपविषय:** जागतिकीकरण, विकास, विस्थापन आणि लिंगभाव, जागतिकीकरण आणि उच्चशिक्षण, जागतिकीकरण आणि प्रादेशिक भाषा, जागतिकीकरण आणि सामाजिक परिवर्तन, जागतिकीकरण, शिक्षण आणि बदलता श्रम व्यवहार, जागतिकीकरण, कुटुंब व्यवस्था विवाह संस्थेतील परिवर्तन, जागतिकीकरण आणि बदलते सामाजिक पर्यावरण, जागतिकीकरण, माध्यमे आणि जमातवाद, जागतिकीकरण आणि सामाजिक न्याय, जागतिकीकरण आणि शिक्षणातील बदल, जागतिकीकरण आणि पर्यायी विकासनीती, जागतिकीकरण आणि भारतातील सांस्कृतीक बदल, अगतिकांचे जागतिकीकरण.

### संशोधन समिती ०३ : लिंगभाव असमानता आणि वर्जीततेचे प्रश्न

**समन्वयक - डॉ. अविनाश वर्धन**, ईमेल - msprc003@gmail.com, मो. नं. ९९६०३०४२५४

**शोधनिबंध उपविषय:** लिंगभाव आणि सैद्धांतिक दृष्टिकोन, शिक्षण आणि लिंगभाव संवेदना, लिंगभाव असमानता आणि शिक्षण प्रणाली, लिंगभाव असमानता आणि भाषा, लिंगभाव आणि राजकारण, लिंगभाव असमानता आणि धर्म, लिंगभाव असमनात आणि पितृसत्ताक समाज, लिंगभाव असमानता : शिक्षण, विकास आणि कामाच्या ठिकाणी महिला, लिंगभाव असमानता आणि परिवर्तनवादी चळवळी, लिंगभाव असमानता आणि रोजगारातील वर्जितता, लिंगभाव संवेदनशीलता आणि आर्थिक स्वावलंबन, लिंगभाव असमानता : घटनात्मक तरतुदी आणि कायदे, LGBTQ-समस्या आणि वर्जितता, लिंगभाव असमानता आणि स्त्रीभ्रूणहत्या.

### संशोधन समिती ०४ : प्रसार माध्यमे आणि समाज

**समन्वयक - डॉ. ज्योती गगनग्रास**, ईमेल - msprc004@gmail.com, मो. नं. ९८२२६५६३६२

**शोधनिबंध उपविषय :** पत्रकारिता आणि महिला, पत्रकारिता आणि शिक्षण, पत्रकारिता आणि विकास, पत्रकारिता महिला पत्रकरांसमोरील आव्हाने, प्रसार माध्यमे आणि स्त्री प्रतिमा, प्रसार माध्यमांचे सकारात्मक परिणाम, प्रसार माध्यमांचे नकारात्मक परिणाम, भारतातील पत्रकारिता आणि महिलांचे स्थान, भारतातील पत्रकारिता आणि महिलांचे योगदान, महिला आणि प्रसार माध्यमांची भूमिका, महिला सशक्तिकरण आणि माध्यमांची भूमिका, प्रसारमाध्यमे, समाज आणि महिला.

## संशोधन समिती ०५ : नागरी समाज

**समन्वयक - डॉ. रवींद्र वाघ,** ईमेल - msprc005@gmail.com, मो. नं. ९४२१८८६५००

**शोधनिबंध उपविषय:** लोकसंख्या वाढीचे नागरी समाजापुढील आव्हाने, नागरी समाज आणि महिला विकासाचे प्रश्न, लोकसंख्या वाढ आणि विकासाचे प्रश्न, शहरी समाज आणि लिंगभाव, नागरी समाजातील एकता आणि विविधता, महिला गुन्हेगारी आणि नागरीकरण, नागरीकरणाचा लिंगभाव, परंपरा, लोकसंख्या तंत्रज्ञानावरील प्रभाव, लोकसंख्या वाढीचे नागरी विकासावरील परिणाम, नागरीकरण आणि महिला रोजगार, नागरी समाज आणि समाजातील बदलते प्रवाह.

## संशोधन समिती ०६ : कृषक समाज आणि स्थित्यांतरे

**समन्वयक - डॉ. हरीश पेटकर,** ईमेल - msprc006@gmail.com, मो. नं. ९४०३६१८३७५

**शोधनिबंध उपविषय:** कृषीव्यवस्था कामाचे स्वरूप व लिंगभाव. कृषीव्यवस्थेमध्ये ग्रामीण महिलांचा सहभाग, कृषी व्यवस्था व लिंगभाव, शेतमजूर व लिंगभाव, ग्रामीण समुदाय, लिंगभाव व आरोग्य, आधुनिक कृषीव्यवस्थेमध्ये लिंगभावाचे बदलते स्वरूप, लिंगभाव व ग्रामीण कौटुंबिक संरचना, लिंगभाव व ग्रामीण आर्थिक जीवन, लिंगभाव व ग्रामीण सामाजिक जीवन.

## संशोधन समिती ०७ : सामाजिक चळवळी व परिवर्तन

**समन्वयक - डॉ. संपत काळे,** ईमेल - msprc007@gmail.com, मो. नं. ८९९९७४४४४८

**शोधनिबंध उपविषय:** लिंगभाव, शिक्षण आणि विकास, लिंगभाव संकल्पना व विकासातील आजची आव्हाने, जात, वर्ग, व लिंगभाव समानतेच्या चळवळी, लिंगभाव नजरेतून पर्यावरणविषयक चलवळींचा अभ्यास, शिक्षण, विकास व महिलांची आजची स्थिति एक तुलनात्मक अभ्यास, लिंगभाव, मुलींचे शिक्षण आणि विकास नीती, लिंगभाव, पुरुषप्रधानता व वंचित शोषितांसंबंधी मांडणी, लिंगभाव, विकास व पंचायत राज आणि राजकीय सहभागासाठीच्या चळवळी, लिंगभाव, शिक्षणविषयक विचार, सद्यस्थिती व परिवर्तन, लिंगभाव, शाश्वत विकास आणि परिवर्तन.

## संशोधन समिती ०८ : नागरिकांची कर्तव्ये

**समन्वयक - डॉ. नलिनी बोरकर,** ईमेल - msprc008@gmail.com, मो. नं. ९५१८९४३५२७

**शोधनिबंध उपविषय:** शिक्षणः मुलभूत अधिकार, लिंगभाव आणि विकासः आर्थिक व सामाजिक दृष्टीकोन, लिंगभाव संबंधाच्या परिप्रेक्षातून सामाजिक विकास, लिंगभाव संबंधाच्या परिप्रेक्षातून आर्थिक विकास, लिंगभाव संबंधाच्या परिप्रेक्षातून राजकीय विकास, लिंगभाव संबंधाच्या परिप्रेक्षातून धार्मिक विकास, लिंगभाव संबंधाच्या परिप्रेक्षातून सांस्कृतिक विकास, लिंगभाव संबंधाच्या परिप्रेक्षातून शैक्षणिक विकास, नागरिकत्व आणि शिक्षण, लिंगभावः शाळा आणि समाज, लिंगभाव समानता, लिंगभाव रूढीबद्धता आणि स्त्रियांचे सक्षमीकरण, जात, वर्ग, धर्म या संदर्भातील लिंगभाव समानता, लिंगभाव आणि विकास दृष्टीकोन व मानवी हक्कांचा आदर, शिक्षण आणि लिंग समानता.

## संशोधन समिती ०९ : हिंसा, गुन्हेगारी आणि भ्रष्ट्राचार

**समन्वयक - डॉ. विनोद खेडकर,** ईमेल - msprc009@gmail.com, मो. नं. ९४२१५३७१२३

**शोधनिबंध उपविषय:** लिंगभावावर आधारित गुन्हे, स्त्रियांविरुद्ध हिंसाचार, पांढरपेशीय गुन्हेगारी आणि महिला, बाललैंगिक शोषण, विकास आंदोलनातील गुन्हे, विकासाच्या प्रकल्पांवर आधारित गुन्हे, सुशिक्षितांमधील गुन्हेगारी, कामाच्या ठिकाणी होणारा महिला अत्याचार, सोशल मिडिया आणि महिला गुन्हेगारी, महिलांवरील गुन्ह्यांवर संचार माध्यमांचा प्रभाव, गुन्हेगारी रोखण्यात सध्याच्या शिक्षण पद्धतीचे योगदान

## संशोधन समिती १० : सिमांतिक समूह

(जात, जमात, अल्पसंख्याक, भटके-विमुक्त समुदाय आणि वर्ग) वर्जिततेचा प्रश्न

**समन्वयक - डॉ. बाबुराव जाधव,** ईमेल - msprc010@gmail.com, मो. नं. ९९७५८११०४१

**शोधनिबंध उपविषय:** लिंगभाव, शिक्षण आणि विकासाविषयीचा समाजशास्त्रीय दृष्टीकोण आणि सामाजिक वर्जीतेचा प्रश्न, शिक्षणाचे समाजशास्त्र आणि विविध सिमांतिक समूहातील स्त्री शिक्षणाच्या समकालीन समस्या, विकासाचे समाजशास्त्र आणि सिमांतिक समूहाच्या वर्जीतेचा प्रश्न आणि समस्या, लिंगभावाचे समाजशास्त्र आणि सिमांतिक समूहातील स्त्री शिक्षणाच्या समस्या, स्त्रियांच्या गळतीचे प्रमाण, शिक्षणाची भाषा व वंचित समूह, अभ्यासक्रमाचा आराखडा आणि लिंगभावानी संकल्पना, शिक्षणाचा मुलभूत अधिकार कायदा (२००९) RTE आणि त्याचा विविध सिमांतिक समूहातील मुलीच्या शिक्षणावरील परिणाम, नवीन शैक्षणिक धोरण २०२० आणि त्याचा विविध सिमातिक समूहातील स्त्री शिक्षणावरील परिणाम आणि पुढील आव्हाने, समकालीन विविध शैक्षणिक संस्थामधील सिमांतिक समूहातील स्त्रियांच्या वर्जीतेचा प्रश्न आणि समस्या, विविध शासकीय आणि निमशासकीय संस्थाची विविध सिमांतिक

समूहातील स्त्रियांच्या शिक्षण आणि विकासातील भूमिका, नवीन विकासाच्या विविध योजना आणि त्यांचे सिमांतिक समूहातील स्त्रियांच्या जीवनावरील परिणाम, शिक्षणाचे खाजगीकरण आणि सिमांतिक समूहातील स्त्री शिक्षणाच्या वर्जीतेचा प्रश्न, सिमांतिक समूहातील स्त्री शिक्षणाचा प्रश्न आणि शिक्षण आणि विकासातील सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक अडगळे आणि समस्या, भटक्या, विमुक्त अल्पसंख्यांक आणि स्थलांतरित समूहातील स्त्रियांच्या आणि मुलींच्या शिक्षणातील आणि विकासातील विविध समस्या.

## संशोधकासाठी सूचना

सर्व संशोधन समित्याकडे संशोधकांनी आपले शोध निबंध २५ जानेवारी २०२५ पर्यंत पाठवावे. या तारखेनंतर आलेले शोध निबंध पत्रिकेत समाविष्ट केले जाणार नाही. याची विशेष नोंद घ्यावी. शोध निबंधाचा गोषवारा २५० ते ३०० शब्दात असावा. संपूर्ण शोध निबंध जास्तीत जास्त २५०० शब्दापर्यंत मर्यादित असावा. शोधनिबंधासाठी फक्त मंगल युनिकोड फोन्ट वापरावा, इतर कोणत्याही फोन्ट मध्ये लिहिलेला निबंध स्वीकारल्या जाणार नाही. शोध निबंध लिहिताना गोषवारा, प्रस्तावना, पूर्व साहित्याचा अभ्यास, अध्ययनाचे उद्देश, गृहीतकृत्ये, अध्ययन पद्धती, तथ्यांचे विश्लेषण, निष्कर्ष, शिफारशी आणि संदर्भ सूची अशा क्रमात शोध निबंध असावा. शोधनिबंधासाठी संदर्भ हे APA style 6th edition मध्ये असावे. शोध निबंध Word फाईल संबंधित संशोधन समिती समन्वयकांच्या ईमेल वर पाठवावे. स्वीकृत शोधनिबंध मराठी समाजशास्त्र परिषद अधिवेशनाच्या अंकामध्ये प्रकाशित करण्यात येईल. शोध निबंधात काही त्रुटी आढळल्यास त्या दुरुस्त करण्याचा किंवा एखादा शोध निबंध नाकारण्याचा संपूर्ण अधिकार कार्यकारी संपादक यांना राहील.

## सभासदाकरिता नोंदणी फी

नोंदणी तपशील (खाली दिलेल्या कालखंडामध्ये नोंदणी केल्यास निर्धारित नोंदणी शुल्क आकारण्यात येईल)

| दिनांक | प्राध्यापक | | तासिका तत्वावरील प्राध्यापक / संशोधक विद्यार्थी | | सोबत येणारे व्यक्ती |
|---|---|---|---|---|---|
| | निवासी | बिगर निवासी | निवासी | बिगर निवासी | |
| **१५ जानेवारी २०२५ पर्यंत** | ३००० | २५०० | २००० | १५०० | ३००० |
| **१६ जानेवारी ते १० फेब्रुवारी २०२५** | ३५०० | ३००० | २५०० | २००० | ३५०० |
| **११ फेब्रुवारी २०२५ ते १६ फेब्रुवारी २०२५** | ४००० | ३५०० | ३००० | २५०० | ४००० |
| **१७ व १८ फेब्रुवारी २०२५** | ४००० | ३५०० | ३००० | २५०० | ४००० |

नोंदणी फी ऑनलाईन करता येईल. त्यासाठी फोन पे, गुगल पे, पेटीएम इत्यादींचा वापर करता येईल. नोंदणी फी खालील खात्यावर पाठवावी व पावतीची गुगल फॉर्ममध्ये सविस्तर माहिती देऊन संशोधन समिती समन्वयकांना पाठवावी आणि पावती प्रत जतन करून ठेवावी. कुटुंबासह येणाऱ्या व्यक्तींची व्यवस्था करण्यात येईल.

**नोंदणी फी साठी बँक माहिती:** बँक ऑफ महाराष्ट्र, शाखा - पाचगणी, अकाउंट नंबर - **60515465976**
IFSC कोड - **MAHB0000219**, MICR कोड - **412014001**

**नोंदणी फॉर्म** https://forms.gle/VSBAC584C72u97W18

**मुख्य संपादक - प्रा. डॉ. लक्ष्मण साळोक, अध्यक्ष, मराठी समाजशास्त्र परिषद,**
मो. नं. ९५२७०७८८५५, ईमेल - salok.laxman@gmail.com
**कार्यकारी संपादक** - १) प्रा. डॉ. साहेबराव हिवाळे, मो. नं. ७५८८०४३८०४ **ईमेल** drsdhiwale@gmail.com
२) प्रा. डॉ. सुधीर येवले, मो. नं. ९६८९०६६८४६ **ईमेल** syevle6@gmail.com

## आपले विनित

| अध्यक्ष | सचिव | कोषाध्यक्ष |
|---|---|---|
| **प्रा. डॉ. लक्ष्मण साळोक** | **प्रा. डॉ. कालिदास भांगे** | **प्रा. डॉ. प्रियदर्शन भवरे** |
| **मराठी समाजशास्त्र परिषद** | **मराठी समाजशास्त्र परिषद** | **मराठी समाजशास्त्र परिषद** |

**संयोजक**
**समाजशास्त्र विभाग**
**श्रीमती मीनलबेन महेता कॉलेज, पाचगणी**
**ता. महाबळेश्वर, जि. सातारा**